# मेट्रो ३ चे पहिले ४ डबे मुंबईत दाखल

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गासाठी ट्रेनचे पहिले चार डबे मुंबईत मंगळवारी पहाटे दाखल झाले. हे डबे चार ट्रेलर्सवर आंध्र प्रदेशातील श्रीसिटीपासून १४०० किमी अंतर १३ दिवसांत ओलांडून मुंबई शहरात पोहोचलेले आहेत.



या डब्यांचा उपयोग भुयारातील ट्रॅकवरील चाचणीसाठी करण्यात येणार आहे. आणखी चार डबे लवकरच मुंबईत पोहोचतील. ४२ टन वजनाचा प्रत्येक डबा खास प्रकारच्या ट्रेलरवरून आणण्यात आला. या ८-एक्सेल ट्रेलर्सना ६४ चाके असतात. आता या डब्यांची जुळवणी करून सारिपूत नगरातील तात्पुरत्या सुविधेमध्ये एक ट्रेन ठेवण्यात येणार आहे. येथेच चाचणी ट्रॅकसुद्धा उपलब्ध आहे. मरोळ-मरोशी मार्ग, सारिपूत नगराजवळील रॅम्पपासून मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३ किमी लांबीच्या ट्रॅकवर प्रोटोटाइप ट्रेनच्या चाचण्या होणार आहेत. आरेनजीक उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या सुविधेत ट्रेन पार्क करण्यात येणार आहे.